SAKAL, Mumbai, 3.10.2024
Page No. 8, Size:(12.50)cms X (10.94)cms.

**Bullet train works speed up, Work of 21 km underground tunnel in progress**

# बुलेट ट्रेनच्या कामांना वेग

## भूमिगत २१ किमीच्या बोगद्याचे काम प्रगतिपथावर

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई/मनोर (बातमीदार) ता. २ : बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी राज्यातील पहिल्या सात किमी लांबीच्या समुद्राखालील बोगद्यासह २१ किमी लांबीच्या बोगद्याच्या बांधकामाला वेग घेतला आहे.

वांद्रे-कुर्ला संकुल येथील मुंबई बुलेट ट्रेन भूमिगत स्थानक ते शिळफाटादरम्यान २१ किमी लांबीचा भारतातील पहिला भूमिगत, समुद्राखालील बोगदा बांधण्यात येत आहे. बोगद्याच्या २१ किमीपैकी १६ किमी टनेल बोरिंग मशीनद्वारे, तर उर्वरित पाच किमी एनएटीएमद्वारे बांधण्यात येत आहे. यात ठाणे खाडीतील सात किलोमीटरच्या समुद्राखालील बोगद्याचाही समावेश आहे.



मुंबई : बुलेट ट्रेन प्रकल्पातील भूमिगत बोगद्याचे काम पूर्णत्वाकडे आले आहे.

मुंबई एचएसआर स्थानकाच्या बांधकामस्थळी शाफ्ट १: शाफ्ट खोली ३६ मीटर १०० टक्के पायलिंगचे काम पूर्ण झाले असून सध्या खोदकाम सुरू आहे. विक्रोळीतील शाफ्ट २ : शाफ्ट खोली ५६ मीटर, १० टक्के पायलिंगचे काम पूर्ण झाले आहे. सध्या शाफ्टसाठी सुमारे ९२ टक्के खोदकाम पूर्ण झाले आहे.

सावली (घणसोलीजवळ) येथील शाफ्ट ३ : शाफ्ट खोली ३९ मीटर, १०० टक्के खोदकाम पूर्ण झाले आहे. या शाफ्टमुळे या वर्षाच्या अखेरीस खाली उतरण्याची अपेक्षा असलेले पहिले टनेल बोरिंग मशीन उपलब्ध होणार आहे. शिळफाटा बोगद्याचे हे एनएटीएम टोक आहे. पोर्टलचे काम पूर्ण झाले असून आतापर्यंत २०० मीटर खोदकाम पूर्ण झाले आहे.

एडीआयटी (ॲडिशनल ड्रिव्हन इंटरमीडिएट टनेल) पोर्टल हा ३९४ मीटर लांबीचा एडीआयटी बोगदा सहा महिन्यांच्या विक्रमी वेळेत पूर्ण झाला आहे. त्यामुळे शिळफाटा व्यतिरिक्त खोदकामासाठी दोन अतिरिक्त एनएटीएम फेसची सोय झाली आहे. या अतिरिक्त प्रवेशामुळे ७०० मीटरहून अधिक भुयारी मार्गाचे काम पूर्ण झाले आहे.

### जिओ टेक्निकल उपकरणे

बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या बांधकामस्थळांवर विविध प्रकारची जिओ टेक्निकल उपकरणे बसविण्यात आली आहेत. खोदकाम आणि बोगद्यासारख्या सुरू असलेल्या भूमिगत कामांना किंवा जागेच्या सभोवतालच्या वास्तूंना कोणताही धोका निर्माण होऊ नये, यासाठी ही उपकरणे महत्त्वाची भूमिका बजावतात.

LOKSATTA, Mumbai, 3.10.2024
Page No. 3, Size:(2.99)cms X (7.47)cms.

## Speeding up work of bullet train

# बुलेट ट्रेनच्या कामाला गती

**मुंबई :** नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेनचे काम हाती घेतले आहे. या मार्गातील मुख्य आकर्षणाचा भाग म्हणजे २१ किमी लांबीचा वांद्रे - कुर्ला संकुल - शीळफाटा बोगदा. समुद्राखालून जाणाऱ्या या बोगद्याचे काम वेगाने सुरू आहे.

मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गिका ५०८ किमी लांबीची असून सुरुवातीचे वांद्रे -कुर्ला संकुल स्थानक भूमिगत आहे. वांद्रे - कुर्ला संकुल - शिळफाट्यापर्यंत २१ किमी लांबीच्या बोगद्यापैकी ७ किमी लांबीचा देशातील पहिला समुद्राखालील बोगदा ठाणे खाडी खालून जाणार आहे. बुलेट ट्रेनच्या अप आणि डाऊन मार्गांसाठी एकच खोदण्यात येणार आहे.